# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः19.04.2024** **वारःशुक्रवार**

1. लोकसभा निवडणूकीच्या पहिल्या टप्प्यासाठीच्या मतदानाला सुरुवात
2. देशभरातील 102 मतदारसंघात 1625 उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात
3. महाराष्ट्रात नागपूर, रामटेक, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर आणि चंद्रपूरमध्ये आज मतदान
4. सर्व मतदारांनी लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होण्याचं राष्ट्रपतींचं आवाहन
5. स्वदेशी तंत्रज्ञानाच्या क्रूझ क्षेपणास्त्राची DRDOकडून यशस्वी चाचणी आणि
6. आंतरराष्ट्रीय टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत भारताचा युकी भांब्रीची फ्रेंच जोडीदारासह उपान्त्य फेरीत आगेकूच

**<u>मतदानाला सुरुवात</u>**

लोकसभा निवडणूकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानाला आज सकाळी 7 वाजता सुरुवात झाली. 17 राज्य आणि 4 केंद्र शासित प्रदेशातील 102 मतदारसंघात 1625 उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत. अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोरम, नागालँड, सिक्किम, अंदमान आणि निकोबार द्विपसमूह, लक्षद्विप, पुदूचेरी, उत्तराखंड आणि तामिलनाडूतील सर्व मतदार संघात आज पहिल्या टप्प्यात मतदान होत आहे. याबरोबरच राजस्थानमधील 12, उत्तरप्रदेशमधील 8, मध्य प्रदेश 6, आसाम आणि महाराष्ट्रातील प्रत्येकी 5, बिहार 4, पश्चिम बंगालमधील 3, मणिपूर 2, छत्तीसगढ, त्रिपूरा आणि जम्मू मधील एका जागेसाठी मतदानाला सुरुवात झाली आहे. अरुणाचल प्रदेश आणि सिक्किम विधानसभेसाठीही आज एकाच टप्प्यात मतदान होत आहे. महाराष्ट्रातील नागपूर, रामटेक, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर आणि चंद्रपूर या पाच मतदारसंघांत आज मतदान होत आहे. राज्यातल्या या पाच लोकसभा मतदारसंघात एकंदर 97 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून, एकंदर 10 हजार 652 मतदान केंद्रं उभारली असल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगानं दिली आहे.

या पहिल्या टप्प्यात राज्यात नितीन गडकरी, सुधीर मुनगंटीवार, प्रतिभा धानोरकर, राजू पारवे, श्यामकुमार बर्वे, सुनील मेंढे, प्रशांत पडोळे, अशोक नेते, नामदेव किरसान या प्रमुख नेत्यांसह अनेक उमेदवारांचं भवितव्य आज मतदान यंत्रात बंद होणार आहे. याबरोबरच पहिल्या टप्प्यात देशातील अन्य प्रमुख उमेदवारांमध्ये केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल, किरेन रिजिजू, काँग्रेस नेते गौरव गोगोई, कार्ती चिदंबरम, तसंच द्रमुकचे दयानिधी मारन हे प्रमुख नेते रिंगणात आहेत. तेलंगणच्या माजी राज्यपाल तमिलिसाई सुंदरराजन तामिळनाडूतून, डीएमके नेते दयानिधी मारन, तामिळनाडू भाजपचे प्रमुख के अन्नामलाई, जम्मू-काश्मीर या केंद्रशासित प्रदेशात उधमपूरमधून केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह हे देखील निवडणूक रिंगणात आहेत.

या सर्व ठिकाणी मतदान यंत्रणा सज्ज असून, कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत आहे. मतदारांसाठी पाणी, स्वच्छतागृहांसारख्या सुविधा पुरवल्या आहेत. मतदान आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांना नेण्यासाठी 41 हेलिकॉप्टर, 84 विशेष गाड्या आणि एक लाख वाहने तैनात करण्यात आली आहेत. मतदान प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी विविध लोकसभा मतदारसंघात 361 निरीक्षक तैनात करण्यात आले आहेत. दरम्यान लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातले उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज संपणार आहे. काल अनेक उमेदवारांनी शक्तीप्रदर्शन करत आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले. महाराष्ट्रातील बहुचर्चित बारामती लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार; तसंच महाविकास

आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांनी काल अर्ज भरले. पुण्याचे महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर, आणि शिरूरचे उमेदवार डॉक्टर अमोल कोल्हे यांनीही शक्तीप्रदर्शन करत काल उमेदवारी अर्ज दाखल केले.

**राणे**

रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघासाठी भाजपानं नारायण राणे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. नारायण राणे आज रत्नागिरी इथं आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

**राष्ट्रपती**

लोकशाहीचा उत्सव समजल्या जाणाऱ्या, लोकसभा निवडणुकीच्या मतदानाला आज सुरुवात झाली; त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नागरिकांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे. भारत केवळ सर्वात मोठी लोकशाही नसून लोकशाहीची जननी आहे. आपल्या देशाचं भवितव्य घडवण्यासाठी प्रत्येकाचा सहभाग महत्त्वाचा आहे; म्हणूनच सर्वांनी आणि प्रामुख्याने नवमतदारांनी लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करावं असं आवाहन राष्ट्रपती मुर्मू यांनी केलं आहे.

**राजीव कुमार**

देशातील नागरिकांनी लोकशाहीसाठी आपली जबाबदारी ओळखावी. निवडणूक आणि याद्वारे होणारी उमेदवाराची निवड ही तुमची आहे. त्यासाठी मतदानाचा हक्क बजावणं आवश्यक आहे असं आवाहन मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आकाशवाणीशी बोलताना सर्व मतदारांना केलं आहे. आपल्या कुटुंबासाठी, मुलांसाठी, गावांसाठी, शहरांसाठी आणि देशासाठी ही जबाबदारी ओळखावी आणि मतदान करावं असंही ते म्हणाले. मतदान केंद्रांवर पुरवल्या जात आसलेल्या सुविधांचाही त्यांनी यावेळी बोलताना उल्लेख केला. लोकशाहीच्या उत्सवात देशातील युवकांनी मोठ्या संख्येनं मतदान करुन नवीन विक्रम प्रस्थापित करावा असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरील संदेशात केलं आहे.

**अधिसूचना**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठीची अधिसूचना काल जारी झाली. या टप्प्यात महाराष्ट्रातील पुणे, शिरूर, मावळ तसंच नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड या अकरा मतदारसंघात 13 मे रोजी मतदान होणार आहे. 25 एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार असून 26 एप्रिलला अर्जांची छानननी होईल. 29 एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येतील. चौथ्या टप्प्यात होणाऱ्या मतदानासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास कालपासून सुरुवात झाली आहे.

**पंतप्रधान**

देशात पहिल्या टप्प्यातील मतदानाला प्रारंभ होत असतानाच अन्य टप्प्यांसाठी निवडणूक प्रचार सुरू आहे. पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज महाराष्ट्रातील वर्धा मतदारसंघातील तळेगांव या गावांत प्रचारसभेला संबोधित करणार आहेत. विद्यमान खासदार रामदास तडस तिसऱ्यांदा महायुतीचे उमेदवार म्हणून निवडणूकीच्या रिंगणात आहेत. तर महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे अमर काळे पहिल्यांदाच वर्धा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. बहुजन समाज पार्टीकडून डॉ मोहन राईकवार या भागातून उमेदवार आहेत. वर्ध्यासह पश्चिम विदर्भात अमरावती, यवतमाळ-वाशिम, बुलडाणा आणि अकोला या मतदारसंघात येत्या 26 एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

**DRDO-चाचणी**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात डी आर डी ओ ने, काल ओडिशाच्या किनारपट्टीवरील चांदीपूर इथल्या एकात्मिक चाचणी केंद्रात, स्वदेशी तंत्रज्ञानाच्या क्रूझ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली. संपूर्णपणे भारतीय तंत्रज्ञानामुळे भारताची संरक्षण सिद्धता पुन्हा एकदा सिद्ध झाल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी यशस्वी उड्डाण-चाचणीबद्दल DRDO चं अभिनंदन केलं आहे.

**युएस-व्हेटो**

पॅलेस्टाईनला संयुक्त राष्ट्रांचं पूर्ण सदस्यत्व मिळावं या ठरावास मोठ्या प्रमाणात पाठिंबा असतानाही अमेरिकनं आपला नकाराधिकार वापरत काल हा ठराव रोखला. पॅलेस्टाईनला राष्ट्रसंघाचा सदस्य म्हणून मान्यता द्यावी अशी शिफारस 193 सदस्यांच्या संयुक्त राष्ट्र सर्वसाधारण सभेत करण्यात आली, त्यावर अमेरिकेनं व्हेटोचा वापर केला. या ठरावावरील मतदानावेळी ब्रिटन आणि स्वित्झर्लंड तटस्थ राहिले तर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या उर्वरित 12 सदस्यांनी ठरावाच्या बाजूनं मतदान केलं.

**राज कुंद्रा**

सक्तवसुली संचालनालयानं काळा पैसा प्रतिबंधक कायदा अर्थात पीएमएलए अंतर्गत कारवाई करून राज कुंद्रा या व्यावसायिकाच्या 97 कोटी 79 लाख रुपयांच्या स्थावर मालमत्तेवर टाच आणल्याचं काल सांगण्यात आलं. ईडीनं दिलेल्या माहितीनुसार राज कुंद्राची, मुंबईतल्या जुहू इथे स्थित आणि सध्या त्याची पत्नी अभिनेत्री शिल्पा शेट्टी हिच्या नावे असलेला निवासी सदनिका, पुण्यातील बंगला आणि कुंद्राच्या नावे असलेले काही समभाग ताब्यात घेण्यात आले आहेत. कथित बिटकॉईन गुंतवणूक अपहार प्रकरणी राज कुंद्राची सध्या चौकशी सुरू आहे.

**तटरक्षकदल**

भारतीय तटरक्षक दलाने मुंबईच्या वायव्य किनारपट्टीवर, डिझेलच्या कथित तस्करीत सहभागी असलेली भारतीय मासेमारी बोट, त्यातील अनधिकृत रोख रकमेसह काल ताब्यात घेतली. पाच खलाशी असलेल्या या बोटीवर 20 हजार लिटर इंधन साठवण्यासाठी, त्याच्या रचनेत बदल केले असल्याचं, तसंच ही बोट अनेक वेगवेगळ्या खोट्या नावांनी चालवली जात असल्याचं आढळून आलं. संशयित बोटीवर आढळून आलेल्या कागदपत्रांमधल्या माहितीचा अर्थ लावल्यावर या बोटीच्या नोंदणीमध्येदेखील अनेक प्रकारच्या विसंगती आढळून आल्या.

**टेनिस**

जर्मनीत म्युनिक इथं सुरू असलेल्या बव्हेरियन आंतरराष्ट्रीय टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत भारताचा युकी भांब्री आणि त्याचा फ्रेंच जोडीदार अल्बानो ओलिव्हेट्टी यांच्या जोडीनं पुरुष दुहेरी च्या उपान्त्य फेरीत प्रवेश केला आहे. या जोडीनं उपांत्य पूर्व फेरीतील सामन्यात रॉबर्ट गॅलोवे आणि इव्हान किंग या अमेरिकन प्रतिस्पर्ध्यांचा 6-3, 6-3 अशा सरळ सेट्सनी पराभव करून पुढची फेरी गाठली. भांब्री आणि ओलिव्हेट्टी या जोडीची आज उपान्त्य फेरीत ऑस्ट्रियाच्या जोडीशी गाठ पडणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं; नमस्कार.